दैनिक
अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे Email : newsaksharaj2021@gmail.com

● वर्ष ०४ थे ● अंक १५ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, रविवार, दि.०८ नोव्हेंबर २०२६ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 04 ● ISSUE : 15 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Sunday, 08 November 2026 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023





दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार ? दोन्ही राष्ट्रवादीतील घडामोडींकडे राज्याचं लक्ष

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०७, मुंबई : ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना शनिवारी (७ नोव्हेंबर) मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला. शरद पवार सध्या मुंबईतीली त्यांच्या 'सिल्व्हर ओक' निवासस्थानी आहेत. डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे. यानंतर आता एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार तथा शरद पवारांचे नातू पार्थ पवार हे 'सिल्व्हर ओक' निवासस्थानी दाखल झाले. शरद पवारांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी ते 'सिल्व्हर ओक' निवासस्थानी दाखल झाले. त्यांनी शरद पवारांची भेट घेतली आहे. दरम्यान, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे काही दिग्गज नेते देखील सिल्वहर ओक निवासस्थानी असल्याची माहिती समोर येत आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं असताना या घडामोडींना जास्त महत्त्व प्राप्त झालं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पार्थ पवार तब्बल दीड तास सिल्व्हर ओक निवासस्थानी होते. यावेळी शरद पवारांच्या सिल्व्हर ओक निवासस्थानी आमदार जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री अनिल देशमुख, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे उपस्थित होते. शरद पवारांना डिस्चार्ज मिळाल्यानंतर हे नेते सिल्व्हर ओकवर पवारांच्या प्रकृतीची विचारपूस





करण्यासाठी पोहोचल्याची माहिती आहे. त्यानंतर पार्थ पवारांनीदेखील सिल्व्हर ओकवर जावून शरद पवारांची भेट घेतल्याची माहिती आहे. पवारांच्या पक्षाचे दिग्गज नेते सिल्व्हर ओकवर उपस्थित असताना पार्थ पवार तिथे गेल्याने याबाबतच्या चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान, पार्थ पवारांचे धाकटे बंधू जय पवार यांनी शरद पवारांना फोन करुन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याची माहिती आहे.

शरद पवार यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार सुरु होते. खोकला आणि कफचा त्रास होत असल्याने त्यांना २ नोव्हेंबरला पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथे दोन दिवस उपचार केल्यानंतर त्यांना ४ नोव्हेंबरला सकाळी रुबी हॉल रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. यानंतर त्यांना मुंबईत नेण्यात आलं होतं. खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली होती. त्यानंतर त्याचदिवशी रात्री त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

● मोदींचा शरद पवारांना फोन, नंतर भेटीगाठी...

शरद पवार यांच्यावर पुण्यातील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी फोन केल्याची माहिती समोर आली होती. यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतेमंडळींनी त्यांची भेट घेतली होती. शरद पवार यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ यांनी वेगवेगळ्या वेळी भेट घेतली होती. प्रफुल्ल पटेल आणि शरद पवार यांच्या भेटीचा एक व्हिडीओ देखील समोर आला होता. या भेटीत १० तारखेला बैठकीबाबत काहीतरी चर्चा सुरु असल्याचं दिसत होतं. यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं.

● सुनील तटकरे यांचं मोठं विधान!

एकीकडे या सर्व घडामोडी घडत असताना सुनील तटकरे यांनी मोठं विधान केलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत बैठका झाल्याच्या वृत्ताचं खंडन करणारे सुनील तटकरे यांनी अचानक अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी हालचाली झाल्याचं वक्तव्य केलं. अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या, असं सुनील तटकरे यांनी सांगितलं. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं.

दुसरीकडे सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सुरु असलेल्या घडामोडींवरुन हे दबावाचं राजकारण असल्याची देखील चर्चा आहे. कारण काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिग्गज नेतेमंडळींनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. या भेटीवरुन चांगलाच राजकीय कलगीतुरा रंगला होता. यानंतर आता दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.

मुख्यमंत्री शेतकऱ्यांसोबत साजरी करणार दिवाळी

स्वागतासाठी गावकऱ्यांमध्ये उत्साह... शेतीसह विविध प्रश्न मांडण्याची मिळणार संधी !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०७, नागपूर : राज्य मंत्रिमंडळातील इतर सहकाऱ्यांसह मी स्वत:ही यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसोबत साजरी करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. या अनुषंगाने मुख्यमंत्री नागपुरातील लोहारी सावंगा गावातील शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करणार आहेत. मुख्यमंत्र्यांचे गावात आगमन होणार असल्याने लोहारी सावंगा येथे सध्या उत्साहाचे वातावरण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी लोहारी सावंगा येथे येणार असल्याने गावकऱ्यांसाठी ही भेट विशेष ठरत आहे.

मुख्यमंत्री थेट गावात येऊन शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये सम धानाची भावना आहे. शेतीसमोरील अडचणी, पिकांचे नुकसान, सिंचनाची उपलब्धता आणि गावाच्या विकासाचे प्रश्न मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्याची संधी मिळणार असल्याने शेतकऱ्यांनाही या भेटीकडून अपेक्षा आहेत.

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यात असलेले लोहारी सावंगा हे शेतीप्रधान गाव आहे. या परिसरातील



ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती असून, संत्रा उत्पादकांसह विविध पिकांची लागवड करणारे शेतकरी या भागात आहेत. नरखेड तालुका संत्रा उत्पादनासाठी ओळखला जातो. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी, फळबागांचे व्यवस्थापन, उत्पादन खर्च, बाजारपेठेतील दर आणि नैसर्गिक संकटांमुळे होणारे नुकसान हे प्रश्न या भागातील शेतीशी संबंधित आहेत. शेतीसाठी पाण्याची उपलब्धता आणि सिंचनाच्या सुविधा हेदेखील या परिसरातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे विषय आहेत.

यंदाच्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार करून मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ प्रशासकीय यंत्रणेकडून मिळणाऱ्या अहवालातून न समजून घेता प्रत्यक्ष गावात जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे. याच अनुषंगाने मुख्यमंत्र्यांचा लोहारी सावंगा दौरा आयोजित करण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या भेटीमुळे शेतकऱ्यांना आपल्या समस्या थेट मांडण्याची संधी मिळणार आहे. पीकनुकसान, पीकविमा, नुकसानभरपाई, कृषी निविष्ठांचे दर, सिंचन, संत्रा उत्पादकांच्या समस्या आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी आवश्यक असलेल्या सुविधांबाबत शेतकरी आपली भूमिका मांडू शकतात.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर गावात आवश्यक तयारी केली जात आहे. गावातील नागरिक, शेतकरी आणि युवकांमध्ये या भेटीची चर्चा असून, मुख्यमंत्र्यांचे स्वागत करण्यासाठी ग्रामस्थ उत्सुक आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसोबत सण साजरा करण्याच्या या उपक्रमामुळे लोहारी सावंगा गावाला राज्यस्तरावर विशेष ओळख मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. दिवाळीच्या आनंदात मुख्यमंत्र्यांचा सहभाग आणि शेतकऱ्यांशी होणारा थेट संवाद यामुळे लोहारी सावंगा येथील हा दौरा विशेष लक्षवेधी ठरणार आहे.

वडगाव सावताळ व गाजदिपूर तलावांचा मशिनद्वारे सर्वे



वडगाव सावताळ व गाजदिपूर परिसरातील तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचन योजना मंजूर झाली असून जलसंपदा विभागाकडून सर्वे पूर्ण करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा प्रकल्प मंत्री विखे पाटील साहेबांच्या मार्गदर्शनाखाली लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे.

– शिवाजी रोकडे
(चेअरमन तथा जिल्हा सरचिटणीस भाजप)

अक्षराज : वसंत रांधवण

दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) : तालुक्यातील वडगाव सावताळ येथील ६ तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भाजपचे जिल्हा सरचिटणीस तथा वडगाव सावताळ सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. गेल्या अनेक महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आशीर्वादाने व सकारात्मक निर्णयामुळे वडगाव सावताळ व गाजदिपूरच्या ६ तलावांसाठी मुळा धरण उपसा सिंचन योजना मंजूर करण्यात आली आहे.

शिवाजी रोकडे यांनी मंत्री विखे पाटील यांची भेट घेऊन वडगाव सावताळ शिवारातील ब्रिटिशकालीन तलाव, लिंग ओहोळ, शिंद मळा, खांबकर झाप, पांढरी व गाजदिपूर अशा ६ तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचनाने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या तलावांमुळे गावचे ४०-५० टक्के क्षेत्र ओलिताखाली येते, पण डिसेंबरनंतर पाणी संपल्याने शेतकऱ्यांच्या पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निम र्ण होतो, हे रोकडे यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले होते.

मंत्री ना. विखे पाटील यांनी या मागणीला तत्काळ सकारात्म क प्रतिसाद देत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना पाहणी व सर्वे क्षणाच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने जलसंपदा विभागाचे अधिकारी आर. बी. बोरुडे यांनी यापूर्वी सर्वे पूर्ण केला होता.

वडगाव सावताळ व गाजदिपूर तलावांचा मशीनद्वारे अंतिम सर्वे करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत मुळा डॅम मार्गे वडगाव सावताळ मधील तलावांमध्ये पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे आपले गाव सुजलाम सुफलाम होणार असून, १२ ही महिने दुष्काळमुक्त होणार आहे. गाव प्रगती पथावर जाणार आहे. ही संपूर्ण योजना जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

यावेळी शिंदे साहेब, चेअरमन शिवाजी रोकडे, दादाभाऊ शिंदे, बाबासाहेब रोकडे,तुकाराम रोकडे, तुकाराम साळुंके, मंगेश खामकर, किरण खामकर, प्रशांत निवडुंगे, सतिष शिंदे, मेहेर भाऊसाहेब, हनुमंत ठाणगे, उत्तम नरे, संदिप व्यवहारे आदी ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या योजनेमुळे वडगाव सावताळ व गाजदिपूर परिसरातील सुमारे ५००० हेक्टर शेतीला कायमस्वरूपी सिंचनाचा आधार मिळणार असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शुभ दीपावली



पुण्यातील घटनेचा थरारक उलगडा ! मित्राच्या घरी गेल्यानंतर बॉडी मिळाली

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०७, पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवडमधील पिंपळे गुरव परिसरात रस्त्याच्या कडेला कचऱ्यात एका पोत्याम ध्ये पुरुषाचे गुडघ्यापासून वेगळे केलेले दोन पाय आढळल्याने मोठी खळबळ उडाली होती. या धक्कादायक हत्याकांडाचा सांगवी पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा केला आहे. विष्णू तानाजी कुंभार असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव असून, अनिल खाडे असं मृत व्यक्तीचं नाव आहे.

पोते उघडून पाहिलं तर...

रामकृष्ण मंगल कार्यालय ते काटेपुरम चौकादरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या कचऱ्यात हा प्रकार उघडकीस आला. काल शुक्रवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या दरम्यान कृष्णा लोट आणि ओमकार काळे हे कचरा गोळा करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांना एका पोत्यावर रक्ताचे डाग दिसले. सुरुवातीला पोत्यात श्वानाचे पाय असल्याचा त्यांना संशय आला. मात्र, पोते उघडून पाहिले असता त्यामध्ये मानवी पाय असल्याचं समोर आलं. त्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

असा झाला हत्याकांडाचा उलगडा

घटनेची माहिती मिळताच सांगवी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तपास सुरू केला असता ज्या पोत्यात मानवी पाय ठेवण्यात आले होते, त्यामध्ये सिमकार्डचे कव्हर आढळले. या कव्हरवरील मोबाईल क्रमांकाच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. या क्रमांकाच्या माध्यमातून पोलिसांना मृत अनिल खाडे याच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचता आले.

त्यानंतर पोलिसांचा तपास आरोपी विष्णू कुंभार याच्यापर्यंत पोहोचला. पोलिसांनी विष्णू कुंभार याच्या घरी धाव घेतली असता घराला कुलूप असल्याचं दिसून आलं. आरोपी घराला कुलूप लावून फरार झाला होता. पोलिसांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला असता आतून दुर्गंधी येत होती. घराची पाहणी केली असता अनिल खाडे याचा मृतदेह आढळून आला. त्यामुळे या संपूर्ण हत्याकांडाचा उलगडा झाला.

दारूच्या नशेत वाद; मित्रानेच केली मित्राची हत्या

पोलिसांच्या तपासानुसार, अनिल खाडे आणि विष्णू कुंभार हे दोघे मित्र होते. रात्री दोघांनी एकत्र दारू प्यायली होती. यावेळी त्यांच्यात वाद झाला. याच वादातून विष्णू कुंभार याने अनिल खाडे याच्या डोक्यात लोखंडी वस्तूने वार करून त्याला बेशुद्ध केले.

त्यानंतर कोयत्याने गुडघ्यापासून दोन्ही पाय वेगळे केले. हत्येनंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने मृतदेहाचे विभक्त केलेले दोन्ही पाय पोत्यात भरले आणि रामकृष्ण मंगल कार्यालय ते काटेपुरम चौकादरम्यान रस्त्याच्या कडेला असलेल्या कचऱ्यात फेकून दिले.



२ दैनिक अक्षराज

• ठाणे, रविवार, दि.०८ नोव्हेंबर २०२६

संमिश्र

संपादकीय



मानवतेचा दीप लावू!



आपण वर्षभर विविध सण आणि उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करतो. मात्र, या सर्व सणांमध्ये दिवाळी या सणाचे स्थान विशेष आहे. दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण म्हणून ओळखला जातो. सलग पाच दिवस साजरा होणारा हा सण लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांच्याच आवडीचा आहे. दिवाळीचे आगमन होताच सर्वत्र चैतन्याचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते. घराघरांत स्वच्छता, सजावट, आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, फराळ आणि नवीन कपड्यांची लगबग सुरू होते. त्यामुळेच दिवाळीला सणांचा राजा म्हटले जाते.

लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवीन कपडे, फटाके, मिठाई, फराळ, किल्ला बनविणे आणि मामाच्या गावाला जाणे अशा अनेक आवडत्या गोष्टी दिवाळीत अनुभवायला मिळतात. भाऊबीजेच्या निमित्ताने भाऊ-बहिणींच्या नात्यातील प्रेम आणि जिव्हाळा अधिक दृढ होतो. सासरी गेलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी माहेरी येते. त्यामुळे दिवाळी हा केवळ दिव्यांचा सण नसून नाती जपणारा आणि माणसांना एकमेकांशी जोडणारा सणदेखील आहे. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा दीपोत्सव! या सणाच्या निमित्ताने बाजारपेठा आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या, मिठाई, फराळाचे साहित्य आणि नवीन कपड्यांनी सजून जातात. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही. प्रत्येक जण आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न करतो. मात्र, हा आनंद साजरा करताना समाजातील दुर्लक्षित घटकांच्या परिस्थितीचेही भान ठेवणे आवश्यक आहे.

आपण आपल्या घरात आनंदाने दिवाळी साजरी करत असताना जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाच्या घरातील दिवाळी मात्र अनेकदा अंधारात असते. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी शेतमालाला योग्य भाव न मिळाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. वर्षभर कष्ट करूनही त्याच्या पदरी निराशाच पडत असेल, तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. आपल्या घरात दिव्यांची रोषणाई करताना शेतकऱ्याच्या घरातही आनंदाचा दिवा पेटावा, यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. शेतकऱ्यांकडून शक्य तिथे शेतमालाची थेट खरेदी करणे, गरजू शेतकरी कुटुंबांना मदत करणे आणि त्यांच्या कष्टांचा सन्मान करणे, हीदेखील दिवाळी साजरी करण्याची एक चांगली पद्धत ठरू शकते.

दिवाळी हा केवळ बाह्य प्रकाशाचा उत्सव नाही, तर अंतःकरणातील अंधार दूर करण्याची प्रेरणा देणारा सण आहे. घराबाहेर आकाशकंदील आणि पणत्या लावून आपण अंधार दूर करतो; परंतु आपल्या मनातील अज्ञान, अंधश्रद्धा, द्वेष, मत्सर, अहंकार आणि विषमतेचा अंधार दूर करण्याचा प्रयत्नही केला पाहिजे. ज्ञान, विवेक, प्रेम, बंधुभाव आणि सद्विचारांचे दिवे आपल्या अंतःकरणात प्रज्वलित झाले, तरच जीवन खऱ्या अर्थाने प्रकाशमय होईल. आज समाजात गरीब, कष्टकरी, अनाथ, निराधार, दिव्यांग आणि वंचित असा मोठा वर्ग आहे. अनेकांच्या घरात दिवाळीच्या दिवशीही गोडधोड बनत नाही. काही मुलांना नवीन कपडे मिळत नाहीत, तर काही कुटुंबांना दोन वेळचे अन्न मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत आपण आपल्या घरात दिवाळी साजरी करताना या लोकांच्याही जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गरजू मुलांना नवीन कपडे, शैक्षणिक साहित्य, मिठाई देणे, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांची भेट घेणे, अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी करणे, गरजू कुटुंबांना अन्नधान्याची मदत करणे अशा छोट्या-छोट्या कृतींतून आपण त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवू शकतो.

दिवाळी साजरी करताना पर्यावरणाचे भान राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. फटाक्यांच्या अतिवापरामुळे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण वाढते. त्याचा त्रास लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि प्राणी-पक्ष्यांना सहन करावा लागतो. त्यामुळे फटाक्यांचा अनावश्यक वापर टाळून मातीच्या पणत्या लावणे, पर्यावरणपूरक सजावट करणे आणि स्वच्छतेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आनंद साजरा करताना दुसऱ्यांच्या आनंदावर किंवा आरोग्यावर विरजण पडणार नाही, याची काळजी घेणे हीच खरी सामाजिक जाणीव आहे.

साने गुरुजींच्या विचारांप्रमाणे प्रेम, करुणा आणि मानवता हीच खऱ्या अर्थाने जीवनाची संपत्ती आहे. केवळ घराबाहेर असंख्य दिवे लावून दिवाळी साजरी होत नाही, तर अंतःकरणात प्रेमाच्या आणि माणुसकीच्या पणत्या प्रज्वलित झाल्या पाहिजेत. आपल्या ताटातील अन्न स्वतः खाणे ही प्रवृत्ती, दुसऱ्याच्या ताटातील अन्न ओरबाडणे ही विकृती, तर आपल्या ताटातील अन्न दुसऱ्याला देणे ही संस्कृती आहे. या संस्कृतीचे जतन करण्याची संधी दिवाळी आपल्याला देत असते.

मानवाच्या जीवनात सुख आणि आनंद निर्माण करण्यासाठी अनेक धडपडी सुरू असतात. मात्र, खरा आनंद केवळ स्वतःच्या सुखात नसून दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यात आहे. दुसऱ्याचे दुःख समजून घेणे, गरजूंना मदतीचा हात देणे, निराधारांना आधार देणे आणि समाजातील दुर्बल घटकांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे, यातच माणुसकीचे खरे सार्थक आहे.

चला तर मग, या दिवाळीत केवळ घराघरांत दिवे लावण्यापुरते मर्यादित न राहता माणसामाणसांतील प्रेमाचा आणि विश्वासाचा दीप प्रज्वलित करूया. दीन-दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊया, गरजूंना मदतीचा हात देऊया आणि त्यांच्या जीवनात आनंदाची फुले फुलवूया. आपल्या घरातील दिव्यांबरोबरच दुसऱ्यांच्या जीवनातही प्रकाश निर्माण करण्याचा संकल्प करूया.

कारण दिवाळीचा खरा आनंद फटाक्यांच्या आतषबाजीत किंवा रोषणाईत नसून दुसऱ्याच्या चेहऱ्यावर फुललेल्या हास्यात आहे. आपल्या आनंदात दुसऱ्यांना सहभागी करून घेतले, त्यांच्या जीवनातील दुःखाचा अंधार दूर केला, तरच दिवाळीचा हा प्रकाशोत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल. चला, या दिवाळीत माणुसकीचा, प्रेमाचा आणि मानवतेचा दीप लावूया!

– श्याम ठाणेदार

पुस्तकांना दुसरा वाचक, ज्ञानाला नवे आयुष्य – नवरात्री रिसोर्सेस रिव्हायवल

जे अपेक्षित होते ते मिळाले नाही; पण अनपेक्षितपणे जे मिळाले, त्याने पुढे जाण्याचे बळ दिले!

'नवरात्री रिसोर्सेस रिव्हायवल'चा पहिला दिवस : माणसांमधील संवेदनशीलता, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीचा अनुभव

काही उपक्रमांची सुरुवात मोठ्या आर्थिक पाठबळाने किंवा भक्कम यंत्रणेने होत नाही. ते एका विचारातून जन्म घेतात आणि त्या विचारावर असलेल्या विश्वासाच्या बळावर पुढे जातात. 'नवरात्री रिसोर्सेस रिव्हायवल' हा असाच एक उपक्रम. घरातील गणेशपूजेपासून सुरू झालेला हा प्रवास ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या सहकार्याने नवरात्रोत्सवाच्या काळात ३५ पोलीस ठाण्यांपर्यंत पोहोचला आणि आता दीपावलीच्या प्रकाशपर्वात सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागातून ज्ञानदानाच्या एका नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे. आपल्या संस्कृतीतील नऊ शक्तींचे प्रतीक असलेल्या नवरात्रीनंतर दीपावलीचा प्रकाश म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा संदेश. याच भावनेतून 'ज्ञानप्रकाश' निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

माझ्या मनात या उपक्रमाची संकल्पना मांडताना एक साधा विचार होता. आपल्या घरात अनेक पुस्तके असतात. ती आपण आवडीने विकत घेतलेली असतात, जपलेली असतात आणि अनेकदा आयुष्याचा महत्त्वाचा काळ त्यांच्यासोबत घालवलेला असतो. मात्र कालांतराने ती पुस्तके कपाटातच राहतात. ती रद्दीत जाऊ नयेत, तर त्यांना दुसरा वाचक मिळावा, त्यांच्या ज्ञानाचा प्रवास पुढे सुरू राहावा, एवढाच या प्रयत्नामागील प्रामाणिक हेतू आहे. प्रत्येक पुस्तकाला दुसरा वाचक मिळवून देणे, हा केवळ पुस्तकांचा पुनर्वापर नसून ज्ञानदानाची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न आहे.

या संकल्पनेला अनेकांनी सुरुवातीला चांगला प्रतिसाद दिला. चर्चांमध्ये कौतुक झाले, सहभागाची आश्वासने मिळाली आणि काहींनी सार्वजनिक व्यासपीठांवरही या विचाराचे समर्थन केले. त्या विश्वासावर मी सर्वसामान्य नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. काही परिचित व्यक्ती आणि जबाबदार पदांवर असलेल्या लोकांकडून प्रत्यक्ष सहभागाची अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीची वेळ आली, तेव्हा परिस्थिती वेगळी दिसली. कोणाला कौटुंबिक जबाबदाऱ्या होत्या, कोणाला व्यावसायिक अडचणी होत्या, तर काहींनी संपर्कही साधला नाही. एखाद्या सामाजिक उपक्रमाला प्रत्यक्ष मदत करणे शक्य नसले, तरी साधे शुभेच्छांचे दोन शब्दही अनेकदा माणसाला पुढे जाण्याचे बळ देतात. तेही मिळाले नाहीत, याची खंत मनात नक्कीच निर्माण झाली.

पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि कचरा व्यवस्थापन याविषयी आपण सर्वजण चर्चा करतो. मात्र विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची वेळ आली की आपली प्राधान्यक्रमाची यादी बदलते, हा अनुभव पुन्हा आला. अर्थात, प्रत्येकाच्या अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. परंतु सामाजिक बांधिलकी ही केवळ चर्चे पुरती मर्यादित राहू नये, एवढीच अपेक्षा असते.

मात्र या अनुभवाचा दुसरा पैलू अधिक आशादायक होता. ज्यांच्याकडून अपेक्षा होती, त्यांच्यापैकी काही जण आले नाहीत; पण ज्यांना मी आयुष्यात कधी भेटलोही नव्हतो, अशा अनेकांनी पुढाकार घेऊन सहभाग नोंदवला. पहिल्याच दिवशी दहापेक्षा अधिक गटांनी सहभाग घेतला. त्यांनी केवळ पुस्तके दिली नाहीत, तर उपक्रमाची संकल्पना समजून घेतली, प्रश्न विचारले आणि भविष्यात आणखी कोणत्या प्रकारे योगदान देता येईल, याविषयी चर्चा केली. काहींना स्वतः येणे शक्य नसल्याने त्यांनी आपले प्रतिनिधी पाठवले, तर काहींनी परतल्यानंतर भेट देण्याचे आश्वासन दिले. या प्रत्येक कृतीतून उपक्रमाविषयीचा विश्वास दिसून आला.

या अनुभवात ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रंजित यादव यांनी दाखवलेला सहभाग विशेष उल्लेखनीय वाटला. उपक्रमासाठी जागेची उपलब्धता करून देण्यास त्यांनी सहकार्य केले. एवढेच नव्हे, तर सणासुदीचा काळ आणि कामाचा व्यस्त दिनक्रम असूनही त्यांनी प्रत्यक्ष भेट दिली आणि स्वतः पुस्तकेही दान केली. एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याने केवळ सुविधा उपलब्ध करून देण्यापलीकडे जाऊन स्वतः सहभागी होणे, ही सामाजिक उपक्रमासाठी निश्चितच प्रोत्साहन देणारी बाब आहे.

साहित्यप्रेमी मित्र विष्णू यादव यांचा अनुभवही मनाला स्पर्शून गेला. त्यांनी स्वतःच्या परिचितांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले. पुस्तके देऊन झाल्यानंतर सभागृहातून बाहेर पडताना ते अचानक मागे वळले. खिशातून ५०० रुपये काढून माझ्या हातात देत म्हणाले, अशा उपक्रमाच्या समन्वयासाठी आर्थिक साधनांचीही गरज असते. माझ्याकडून ही छोटीशी मदत. मी त्यांच्याकडे कोणत्याही आर्थिक मदतीची मागणी केली नव्हती. त्यांनी स्वतःहून केलेली ही कृती माझ्यासाठी त्या रकमेपेक्षा कितीतरी मोठी होती. कारण त्यांना पुस्तक संकलनाच्या पलीकडे जाऊन अशा उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या प्रयत्नांची जाणीव झाली होती.



या प्रसंगाचे महत्त्व मला आणखी एका वैयक्तिक अनुभवामुळे प्रकर्षाने जाणवले. त्या दिवशी सकाळी घरातून निघताना माझ्या खिशात केवळ ७५ रुपये होते. कार्यक्रम संपल्यानंतर घरी कसे परतायचे, इतकेच नव्हे तर एखाद्याला पाण्याची गरज भासल्यास ती कशी भागवायची, याचीही निश्चित व्यवस्था माझ्याकडे नव्हती. तरीही उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. कारण माझ्या आयुष्यातील एक अनुभव सातत्याने मला पुढे जाण्याचे बळ देत आला आहे. एखाद्या प्रामाणिक सामाजिक बांधिलकीतून काम सुरू केले की आवश्यक ते सहकार्य अनेकदा अनपेक्षित मार्गाने मिळते. ते नेहमी पैशांच्या स्वरूपात असेलच असे नाही. कधी एखाद्या माणसाच्या कृतीतून, कधी त्याच्या शब्दांतून, तर कधी त्याच्या विश्वासातून ते मिळते.

याच प्रवासात एक कटू अनुभवही आला होता. एका शासकीय अधिकाऱ्याला उपक्रमाची माहिती देण्यासाठी आणि सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यासाठी भेटलो होतो. त्या वेळी माझी पत्नी रुग्णालयात दाखल असतानाही मी सामाजिक काम सुरू ठेवल्याचे सांगितले. त्यावर मला, तुमच्या कुटुंबाची माझ्या कुटुंबाशी तुलना करू नका. मी अधिकारी आहे आणि तुम्ही सामान्य माणूस आहात, असे उत्तर मिळाले. त्या प्रतिक्रियेने मनाला वेदना झाल्या. कारण मी कोणाशीही तुलना करण्यासाठी किंवा स्वतःच्या अडचणी सांगून सहानुभूती मिळवण्यासाठी तेथे गेलो नव्हतो. एका चांगल्या सामाजिक उपक्रमासाठी सहकार्य मिळू शकते का, एवढीच अपेक्षा होती.

पत्नी रुग्णालयातून घरी परतल्यानंतर मी तिला हा प्रसंग सांगितला. तिने दिलेले उत्तर मात्र माझ्यासाठी महत्त्वाचे ठरले. ती म्हणाली, आपण समाजासाठी काम करतो आहोत, त्या अधिकाऱ्यासाठी नाही. त्यांना माफ कर आणि आपले काम अधिक ताकदीने सुरू ठेव. तिच्या या एका वाक्याने माझ्या मनातील कटुता दूर झाली. व्यक्तीच्या प्रतिक्रियेमुळे समाजासाठी करण्याचे काम थांबवायचे नसते, हा विचार पुन्हा दृढ झाला.

पहिल्या दिवशी जमा झालेली पुस्तके पाहताना आणखी एक महत्त्वाची जाणीव झाली. अनेकांनी दिलेली पुस्तके खरोखरच दुर्मीळ आणि मौल्यवान संग्रहातील होती. ती पुस्तके देताना त्यांच्या मालकांच्या मनात एक विश्वास होता की, हा ज्ञानाचा ठेवा योग्य हातांमध्ये पोहोचेल. नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड कमी होत असल्याची त्यांना चिंता होती. आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग असलेली पुस्तके रद्दीत न जाता दुसऱ्या वाचकापर्यंत पोहोचावीत, अशी त्यांची मनापासून इच्छा होती. आम्ही त्यांच्याशी संवाद साधला, उपक्रमाचा उद्देश समजावून सांगितला आणि ते सभागृहातून बाहेर पडताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि विश्वास दिसत होता. त्यांच्या विश्वासाचे सार्थक करणे ही आता आमची जबाबदारी आहे.

या उपक्रमाचा उद्देश केवळ पुस्तके गोळा करून त्यांचे वितरण करणे एवढाच नाही. त्यामागे एक व्यापक सामाजिक आणि पर्यावरणीय विचार आहे. आज आपण घरातील अनेक वस्तू वापरणे बंद झाल्यानंतर त्यांना कचरा समजतो. परंतु एखाद्या वस्तूचा आपल्यासाठीचा उपयोग संपला म्हणजे तिचे उपयुक्त आयुष्य संपले, असे नसते. एखादे पुस्तक दुसऱ्या व्यक्तीसाठी ज्ञानाचे दालन उघडू शकते. एखादे वस्त्र दुसऱ्याच्या उपयोगी पडू शकते. फर्निचर, शैक्षणिक साहित्य आणि इतर अनेक वस्तूंनाही नवे आयुष्य मिळू शकते. त्यामुळे 'माझ्या उपयोगाचे नाही, म्हणजे ते निरुपयोगी आहे' ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. वापरात नसलेल्या वस्तूंचे पुनर्वापर, पुनर्वितरण आणि योग्य उपयोग यांची सवय घराघरांत निर्माण झाली, तर कचऱ्याचे प्रमाण कमी करण्याबरोबरच संसाधनांविषयीची आपली दृष्टीही बदलू शकते. हाच या उपक्रमातून अपेक्षित असलेला वर्तनबदल आहे.

पहिला दिवस हा या प्रवासाचा केवळ प्रारंभ आहे. पुढील दिवसांत आणखी अनेक नागरिक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. काहींनी आधीच येण्याची तयारी दर्शवली आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान महत्त्वाचे आहे. कारण येथे केवळ पुस्तकांचे हस्तांतरण होत नाही, तर एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीवरील विश्वास, समाजाविषयीची संवेदनशीलता आणि ज्ञानदानाची परंपरा पुढे नेण्याची इच्छा यांचेही हस्तांतरण होत आहे.

या अनुभवाने मला पुन्हा एकदा माझ्या आयुष्यातील एका तत्त्वाची आठवण करून दिली. प्रयत्न न करता आपण हार मानू नये. अपेक्षित व्यक्ती सोबत आली नाही म्हणून उद्दिष्ट सोडू नये. कधी परिचितांची साथ कमी पडते, तर कधी अनोळखी माणसे आपल्याला अपेक्षेपेक्षा अधिक बळ देतात. शेवटी एखाद्या उपक्रमाचे यश कोण किती मोठ्या पदावर आहे किंवा कोण किती मोठे आश्वासन देतो, यावर ठरत नाही; तर प्रत्यक्ष कृतीतून किती जण जोडले जातात, यावर ठरते.

गणेशपूजेपासून सुरू झालेला हा प्रवास नवरात्रीच्या सामाजिक सहभागातून पुढे आला आणि आता दीपावलीच्या प्रकाशात ज्ञानदानाचा संदेश घेऊन नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. या दीपावलीत मला मिळालेला सर्वांत मोठा आनंद दिव्यांच्या प्रकाशापेक्षा वेगळा आहे. तो आहे, आपल्या जपलेल्या पुस्तकांचा ठेवा दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचेल, या विश्वासाने पुस्तके देणाऱ्या नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसलेले समाधान.

कारण खरा ज्ञानप्रकाश दिवा लावल्यानेच निर्माण होत नाही; तो एका पिढीने मिळवलेले ज्ञान दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या कृतीतूनही निर्माण होतो.

– विजयकुमार कट्टी
मो.७९७७५१३८२२

अभ्यंग स्नान

नरक चतुर्दशी दिनी
सचैल अभ्यंग स्नान
शरीरास नसे केवळ
शुचिर्भूतमनास मान

पहाटे शुभमहोत्सव
करावे यम दीप दान
एकदुजा भेटी गाठी
शुभेच्छा करी प्रदान

तेलं चोळता सर्वांगा
तमोगुण जाई गळून
रंध्रे लागती बोलाया
रोग राई जाते पळून

त्वचास्निग्धता मिळे
शरीर सर्वार्थ साधन
मनाचे छानआवरण
शरीरही व्हावे सधन

नव वर्षात पदार्पण
नवीन वस्त्रे परिधान
नव संकल्प विचार
अंतरी होई समाधान

दुष्काळ नरकअसूरा
सांघीक प्रयासेभेदून
परिक्षा दिपोत्सवाची
तिमीर टाकूया छेदून

धर्म राहू द्या बाजूला
शास्त्र घ्यावे जाणून
आनंदे करावे जरूर
अभ्यंग स्नान म्हणून

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

स्त्रीसन्मानाचा आणि उदारतेचा संदेश देणारी 'नरक चतुर्दशी' !

वसुबारस आणि धनत्रयोदशी हे दिवाळीतीलच सण असले, तरी खरी दिवाळी सुरु होते ती नरक चतुर्दशी पासून. या दिवशी बहुतांश घरांत बच्चे कंपनीसह वयोवृद्ध आजी आजोबाही पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल आणि सात्विक उटणे लावतात. शीतोष्ण पाण्याने अभ्यंग स्नान करतात आणि स्नानानंतर ओल्या अंगाने डाव्या पायाच्या अंगठ्याखाली नरकासुराचे प्रतीक म्हणून कारेटे ठेवून ते फोडतात. त्यातून निघणाऱ्या बियांपैकी एक बी कपाळाला लावतात आणि रक्ताचे प्रतीक असलेला त्यातील कडू रस थोडा जिभेला लावतात. श्रीमद्भागवतपुराणातील कथेनुसार पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो प्रचंड त्रास देत असे. तो स्त्रियांचाही छळ करत असे. त्याने ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले आणि कुणाकडूनही वध होणार नाही – असा वर मागून घेतला होता. त्या वराच्या बळावर त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या आणि त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले होते. नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले आणि मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले होते. त्याने राजांची संपत्ती लुटली होती हव्यासापोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले आणि वरुणाचे विशाल छत्रही बळकावले होते. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व आणि मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती. ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. त्याच्या या बलपूर्वक छळाने समस्त देवता आणि राजे महाराजे त्रस्त झाले होते. त्याच्या जाचातून मुक्त होण्यासाठी सर्वांनी मिळून श्रीकृष्णाचा धावा केला. नरकासुराला जन्माची अद्दल घडवण्यासाठी श्रीकृष्णाने सत्यभामेसह नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व उपवर राजकन्यांना मुक्त केले. त्या काळात शत्रूच्या कैदेत राहिलेल्या स्त्रियांना समाज किंवा त्यांचे स्वतःचे कुटुंब देखील परत स्वीकारत नसे. त्या स्त्रियांनी श्रीकृष्णाकडे आपलं रक्षण करण्याची आणि त्यांना सन्मान देण्याची विनंती केली. श्रीकृष्णाने तात्काळ त्यांच्याशी विवाह करून त्यांना 'राजराणी' चा दर्जा दिला. त्यांनी समाजासमोर घोषणा केली की या सर्व स्त्रिया आता 'कृष्णपत्नी' म्हणून ओळखल्या जातील, जेणेकरून कोणाचीही त्यांच्यावर बोट दाखवण्याची हिंमत होणार नाही १६१०० स्त्रियांशी झालेला हा विवाह कोणताही विलासी विवाह नसून एक अवतारी पुरुषाने स्त्रीच्या सन्मानासाठी आणि प्रतिष्ठेसाठी उचललेले क्रांतिकारी पाऊल होते. नरकासुराच्या बंदिवासातून मुक्त करून आणि त्यांच्याशी विवाह करून श्रीकृष्णाने केवळ १६१०० स्त्रियांचाच उद्धार केला नाही तर तत्कालीन अनिष्ट बाबींविरुद्ध बंड पुकारून स्त्रीसन्मानाचे मूर्तिमंत उदाहरण जगासमोर ठेवले आहे. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. उन्मत्त आणि भोगविलासी नरकासुराला इच्छित वर देऊन आणि नरकासुराच्या नावाला अमरत्व देऊन श्रीकृष्णाने आपली उदारता दर्शवली आहे. या दिवशी सकाळी अभ्यंगस्नानानंतर अपमृत्यू निवारणार्थ यमतर्पण केले जाते. तर्पणाचा विधी पंचांगात दिलेला असतो त्याप्रमाणे करावा. या दिवशी काहीजण ब्राह्मणभोजन घालतात तसेच या दिवशी वस्त्रदानही केले जाते. या दिवशी प्रदोषपूजा आणि शिवपूजाही केली जाते.


उन्मत्त झालेल्या नरकासुराला श्रीकृष्णाने ठार करून देवतांसह प्रजाजनांना भयमुक्त केले. असे असताना गोव्यासारख्या काही ठिकाणी दिवाळीनिमित्त भगवान श्रीकृष्णाचे पूजन करण्याऐवजी नरकासुर वधाची स्पर्धा आयोजित केले जाते. ज्यामध्ये तेथील मंडळे, संस्था, संघटना मोठ्या प्रमाणात भाग घेतात. या स्पर्धेसाठी प्रत्येक मंडळ नरकासुराचा भव्य पुतळा बनवतात. त्याची मिरवणूक काढली जाते. नागरिकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जरी या स्पर्धेचे आयोजन केले जात असले, तरी या माध्यमातून दुराचारी नरकासुराचे उदात्तीकरण करत आहोत हे नागरिकांच्या केव्हा लक्षात येणार ? कोकणपट्टीचा भाग असलेले गोवा पूर्वीपासून शेतीप्रधान राज्य होते. कोकणात प्रामुख्याने भाताची शेती केली जाते. या दिवसांत शेतातून भाताचे पीक काढल्यावर उरलेल्या तणापासून पूर्वी नरकासुराचा पुतळा बनवला जाई आणि त्याचे दहन केले जात असे. ही प्रथा पुढे व्यापक होऊन आजमितीला सहस्रो रुपये व्यय करून नरकासुराचे पुतळे बनवले जातात. गोव्यातील नरकासुर स्पर्धेचे लोण हळूहळू सिंधुदुर्गातही येत चालले आहे. ज्यामुळे या सणामागील मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. असुरी प्रवृत्तीला खतपाणी घालणाऱ्या या स्पर्धेला खरेतर नागरिकांनीच विरोध करायला हवा !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचा पराभव भारतावर अनेक परिणाम करणार

नुकत्याच अमेरिकेमध्ये सिनेट व होऊस ऑफ रिप्रेसेंटेटिव्ह या दोन सभागृहाच्या मध्यावधी निवडणूका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाने अभूतपूर्व यश मिळविले. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह या सभागृहात एकूण ४३५ जागांपैकी २३१ जागा जिंकल्या. तर सिनेटमध्ये एकूण १०० जागांपैकी ५४ जागा जिंकल्या. या निवडणुकीत अमेरिकन जनतेने ट्रम्प यांच्या धोरणावर जाहीर नाराजी मतपेटीतून दाखविली आहे अलीकडे ट्रम्प यांची अनेक धोरणे हम करेसो कायदा या तत्वाप्रमाणे होत होती.

इराण युद्धामुळे जगात प्रचंड प्रमाणात महागाई वाढली. अमेरिकेतही याचा परिणाम झाला. ट्रम्प यांची अर्थव्यवस्थेतील अनेक धोरणे अमेरिकन मतदारांना मान्य नव्हती.इतकेच काय पण प्रशासनात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला होता. डेमोक्रॅटिक पक्षाने आरोग्य सेवेबाबत प्रचारात रान उठविले अनेक कृष्णवर्णीय तसेच भारतीय लोकांनी डेमोक्रॅटिक पक्षाला पाठींबा दिला ट्रम्प यांच्या आयातीवरील शुल्कामुळे भारतीय वस्तूवर त्याचा



परिणाम झाला होता. अलीकडे बहुतेक वस्तूवर १८ टक्के इतके शुल्क होते आता त्याचा पुनर्विचार होण्याची दाट शक्यता वाटते. वास्तविक अमेरिकेने इराणवर युद्ध लादले. या युद्धात अमेरिकेची सुद्धा प्रचंड हानी झाली. इराण देशाने चिवटपणे हे युद्ध लढविले व अमेरिकेला जेरीस आणले. वास्तविक हे युद्ध करण्याची काही जरुरी नव्हती.

पण आपले वर्चस्व गाजविण्यासाठी त्यांनी इराण वर युद्ध लादले. याचा परिणाम साऱ्या जगावर झाला. भारतातही महागाई वाढली. अनेक जीवनावश्यक वस्तू महाग झाल्या अमेरिकेत तर सुमारे ६० % मतदारांनी ट्रम्प यांना दोषी धरले सध्याचे अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांनीही अमेरिकेतील पराभव इराण युद्धामुळे झाला असल्याचे मान्य केले आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुका नंतरचे सत्ता संतुलन भारतीय आय टी क्षेत्राला सहाय्यभूत ठरेल असे वाटते. व्हिसा व व्यापार निर्बंध लगेचच शिथिल होतील असे वाटत नाही. जरी दोन्ही सभागृहात डेमोक्रॅटिक पक्षाला बहुमत असले तरीही ट्रम्प यांना नकाराधिकार वापरण्याचे अधिकार आहेत .हे विसरून चालणार नाही. अमेरिकेचा डॉलर कम कुवत झाल्यास रुपयातील उत्पन्नावर दबाव येऊ शकतो रिपब्लीकन पक्षाच्या प्रभावामुळे भारताला अनेक गोष्टीत फायदा होऊ शकतो. भारत अमेरिका व्यापार करारात काही बदल होऊ शकतात. ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या निर्णयामुळे भारतीय निर्यातीवर मोठा परिणाम झाला होता.

भारत अमेरिका संरक्षण संबंधाबाबत मात्र या निकालाचा फारसा परिणाम होण्याची शक्यता नाही भाताच्या रशियन तेल खरेदी करण्याबाबत सुद्धा दिलासा मिळू शकतो अमेरिकेत शिकण्यास जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली होती ती आता वाढू लागेल. एकूणच या प्रभावामुळे भारतावर अनेक परिणाम अपेक्षित आहेत येणाऱ्या नजीकच्या काळात आपणास या परिणामाची वाट पहावी लागेल.

– शांताराम वाघ, पुणे

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.

Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं

दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या दिवाळीसाठी उपमुख्यमंत्री शिंदेंचा पुढाकार

पारनेर तालुक्यात सुजित झावरे पाटलांच्या माध्यमातून दिवाळी शिध्याचे वाटप

अक्षराज : वसंत रांधवण

दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) : दुष्काळाच्या गंभीर संकटात शेतकऱ्यांच्या हाताला काम नाही, शेतीतून उत्पन्न मिळालेले नाही, तर दुसरीकडे पाणीटंचाईचे संकट ही दिवसेंदिवस तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत बळीराजा, शेतमजूर, कष्टकरी कामगार आणि सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांसाठी दिवाळीचा शिधा उपलब्ध करून दिला आहे. हा शिधा पारनेर तालुक्यातील गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याची माहिती सुजित झावरे पाटील यांनी दिली.

तालुक्यातील देसवडे व खडकवाडी येथील आदिवासी कुटुंबांना नुकतेच दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात सुजित झावरे पाटील बोलत होते. यावेळी देसवडे,जामगाव व खडकवाडी परिसरातील गरजू मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

सुजित झावरे पाटील म्हणाले, की दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, यंदा तालुक्यातील अनेक गावांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढली आहे. शेतकऱ्यांच्या हाताला काम नसल्याने आणि शेतीतून उत्पन्न मिळाले नसल्याने अनेक कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत कष्टकरी आणि गोरगरीब कुटुंबांची दिवाळी अंधारात जाऊ नये, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. हीच जाणीव ठेवून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांसाठी दिवाळीचा शिधा पाठविला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याचा प्रयत्न केला जात आहे. दिवाळीचा हा शिधा तालुक्यातील प्रत्येक गरजू कुटुंबापर्यंत पोहोचला पाहिजे. कोणतेही कुटुंब मदतीपासून वंचित राहता कामा नये. यासाठी शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गावागावांत लक्ष देऊन गरजू कुटुंबांपर्यंत शिधा पोहोचवावा, असे आवाहनही सुजित झावरे यांनी केले.



सुजित झावरे पाटील यांचे वक्तव्य

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या माध्यमातून मिळालेल्या या शिध्यामुळे अनेक गरजू कुटुंबांच्या घरात दिवाळीचा आनंद निर्माण होणार आहे. राजकारणात पलीकडे जाऊन माणुसकी जपणे आणि गरजूंच्या सुख- दुःखात सहभागी होणे, हीच खरी समाजसेवा आहे. उपमुख्यमंत्री शिंदे साहेबांनी दिलेली सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन पारनेर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही सदैव यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

वर्षांची अखंड सेवा अन् रोज सायकलवरून १५ किलोमीटरचा प्रवास!

'मोंडूला काका' यांच्या कर्तव्यनिष्ठेला सलाम

विद्याप्रसारक मंडळाचे दत्ता मोंडूला ऊर्फ 'मोंडूला काका' ठरले प्रामाणिकपणा आणि साधेपणाचे आदर्श

अक्षराज : सुनिल फर्डे

दि.०७, शहापूर (ठाणे) : साधी राहणी, उच्च विचार, वेळेचे काटेकोर पालन आणि कामाप्रती प्रचंड निष्ठा असेल, तर कोणतेही काम प्रतिष्ठेचे ठरते, याचा प्रत्यय विद्याप्रसारक मंडळ, किन्हवली येथील दत्ता मोंडूला ऊर्फ सर्वांचे लाडके 'मोंडूला काका' यांच्या जीवनप्रवासातून येतो. गेल्या ३४ वर्षांपासून शिपाई म्हणून अविरत सेवा बजावणाऱ्या मोंडूला काकांची आजही सायकलवरून दररोज होणारी १५ किलोमीटरची ये-जा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

विद्याप्रसारक मंडळाच्या तिन्ही विद्यालयांमध्ये सेवा बजावताना त्यांनी आपल्या कामातून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध, मनमिळाऊ स्वभाव, वक्तशीरपणा आणि प्रामाणिकपणा यामुळे ते सर्वांचेच लाडके बनले आहेत. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते, तर ते किती निष्ठेने केले जाते, यावर त्या कामाची प्रतिष्ठा अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या युगात अनेकजण दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर करतात. मात्र, मोंडूला काका आजही आपल्या जुन्या सायकलीवरून दररोज सुमारे १५ किलोमीटरचा प्रवास करतात.



अनेक वर्षांपासून सुरू असलेला त्यांचा हा सायकल प्रवास केवळ प्रवास नसून तो त्यांच्या शिस्तीचा, साधेपणाचा आणि कर्तव्याप्रती असलेल्या समर्पणाचा जिवंत परिचय आहे. वय, परिस्थिती किंवा बदलत्या काळाची तमा न बाळगता आपले कर्तव्य नियमितपणे पार पाडण्याची त्यांची वृत्ती विशेष कौतुकास्पद आहे.

विशेष म्हणजे, प्रामाणिकपणे नोकरी करत कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी मुलावरही चांगले संस्कार केले. त्यांचा मुलगा आज पाटबंधारे विभागात अभियंता म्हणून कार्यरत आहे. वडिलांनी आयुष्यभर केलेले कष्ट, त्याग आणि दिलेले संस्कार यांचे हे अभिमानास्पद फलित मानले जात आहे.

२ नोव्हेंबर १९९२ पासून सेवेत रुजू झालेल्या मोंडूला काकांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात कधीही प्रसिद्धीचा मोह न बाळगता कामालाच प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून 'काम कोणतेही असो, ते मनापासून आणि प्रामाणिकपणे केले पाहिजे' हा मोलाचा संदेश मिळतो. समाजात मोठेपणा हा पदावरून नव्हे, तर आपल्या कामातून आणि वागण्यातून निर्माण होतो, याचे ते उत्तम उदाहरण आहेत. आजच्या पिढीने त्यांच्या जीवनप्रवासातून साधेपणा, श्रमप्रतिष्ठा, वेळेचे महत्त्व आणि कर्तव्यनिष्ठा हे गुण आत्मसात करण्याची गरज आहे.

३४ वर्षांच्या अखंड सेवेला आणि रोजच्या १५ किलोमीटरच्या सायकल प्रवासाला मनापासून सलाम! मोंडूला काका, तुमची ही निष्ठा खऱ्या अर्थाने समाजासाठी प्रेरणादायी आहे!

ग्रामस्थांच्या इच्छेविरुद्ध कन्हाळगाव अभयारण्य लादू देणार नाही; आदिवासींच्या हक्कांसाठी आ.मुनगंटीवार मैदानात

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०७, चंद्रपूर : कन्हाळगाव अभयारण्याच्या प्रस्तावामुळे ४७ गावांतील ग्रामस्थांच्या अस्तित्वाचा, आदिवासी बांधवांच्या जल, जंगल, जमिनीच्या हक्कांचा आणि हजारो कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार असून स्थानिकांच्या इच्छेविरुद्ध कोणताही निर्णय लादू देणार नाही, अशी ठाम भूमिका माजी वनमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी घेतली आहे. अभयारण्याच्या प्रस्तावाला ग्रामस्थ आणि सरपंच संघटनेचा असलेला विरोध लक्षात घेऊन त्यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत दृश्यप्रणालीद्वारे बैठक घेत स्थानिकांच्या प्रश्नांना वाचा फोडली. वन्यजीव संवर्धनाच्या नावाखाली पिढ्यान्पिढ्या जंगलाशी नाते जपणाऱ्या आदिवासी बांधवांचे हक्क, गावकऱ्यांच्या उपजीविकेची साधने आणि त्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे स्पष्ट करत आ.मुनगंटीवार यांनी हा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासह शासनाच्या सर्वोच्च स्तरावर नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

कन्हाळगाव अभयारण्याचा प्रस्ताव रद्द करण्यासाठी ग्राम स्थांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून सर्वतोपरी प्रयत्न करणार अशी ग्वाहीही आ. मुनगंटीवार यांनी यावेळी दिली.



कन्हाळगाव अभयारण्याचे प्रस्तावित क्षेत्र सुमारे २५१३८.१४६ हेक्टर क्षेत्र असून, गोंडपिपरी तालुक्यातील ३९, पोंभुर्णा तालुक्यातील ५ आणि बल्लारपूर तालुक्यातील ३ अशा एकूण ४७ गावांचा या प्रस्तावाशी संबंध येतो. या परिसरातील मोठ्या वनक्षेत्राचा ताबा सध्या वनविकास महामंडळाकडे असून, महामंडळाच्या माध्यमातून हजारो स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. मात्र, अभयारण्याच्या निर्मितीनंतर कोअर आणि बफर क्षेत्रातील गावांवर विविध निर्बंध येण्याची, वनाधारित रोजगाराच्या संधी कमी होण्याची आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

विशेषतः आदिवासी बांधवांच्या पारंपरिक जीवनशैलीवर आणि जंगलाशी असलेल्या त्यांच्या नैसर्गिक नात्यावर परिणाम होण्याची चिंता बैठकीत मांडण्यात आली.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील पुनर्वसित गावांमधील नागरिकांना आजही विविध समस्यांचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दाही बैठकीत चर्चेला आला. त्यामुळे नव्या अभयारण्याच्या निर्मितीमुळे स्थानिकांना पुन्हा विस्थापन, निर्बंध आणि रोजगाराच्या प्रश्नांना सामोरे जावे लागू नये, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धनाचे मोठे काम सुरू असताना आणखी एका अभयारण्याची आवश्यकता काय, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.

या प्रश्नाला आणखी एक गंभीर पैलू असल्याचे नमूद करत आ. मुनगंटीवार यांनी जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या मनुष्यहानीचा मुद्दा उपस्थित केला. वन्यजीव संवर्धनाबरोबरच जंगलालगत राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताचे संरक्षण आणि सुरक्षिततेची हमी देणे ही तितकेच आवश्यक आहे. अभयारण्यामुळे वन्यजीव आणि मानवी वस्त्यांमधील संघर्ष वाढण्याची भीती स्थानिकांमध्ये आहे. त्यामुळे संवर्धनाच्या धोरणात स्थानिक जनतेच्या हिताला केंद्रस्थानी ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रश्नाच्या पुढील कार्यवाहीसाठी आ. सुधीर मनगंटीवार यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत १८, १९ किंवा २० नोव्हेंबर रोजी बैठक घेण्यासाठी वेळ निश्चित करावी, तसेच वनमंत्री गणेशजी नाईक आणि वनविभागाच्या सचिवांसोबत सविस्तर चर्चा घडवून आणावी, असे त्यांनी सांगितले. याशिवाय कन्हाळगाव अभयारण्यासंदर्भात झालेल्या सर्व प्रशासकीय हालचाली उपलब्ध करून घ्याव्यात, अशी सूचनाही त्यांनी केली. नागपूर किंवा चंद्रपूर येथे वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी, सरपंच संघटनेचे प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिकांची संयुक्त बैठक आयोजित करून सर्व बाजू समजून घ्याव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला वनविकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एम.श्रीनिवास राव, प्रादेशिक व्यवस्थापक दिव्याभारती एम., ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला, सरपंच संघटनेचे अध्यक्ष देविदास सातपुते विविध गावांचे सरपंच, नागरिक आणि वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते

केदार जाधव यांच्या हस्ते पेणमध्ये टर्फ क्रिकेट इनडोअर स्टेडियमचे दिमाखात लोकार्पण

मंत्री आदिती तटकरे यांची प्रमुख उपस्थिती; नवोदित क्रिकेटपटूंना प्रोत्साहन आणि क्रीडा साहित्याचे वाटप



अक्षराज : मितेश जाधव

दि.०७, पेण (रायगड) : रायगड जिल्ह्यातील क्रिकेटपटूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पेण शहरात उभारण्यात आलेल्या टर्फ क्रिकेट इनडोअर स्टेडियमचे लोकार्पण आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू केदार जाधव आणि मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा पेण नगरपालिकेचे पक्षप्रतोद अनिरुद्ध पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणातील या नव्या स्टेडियममुळे स्थानिक क्रिकेटपटूंना सरावासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. यावेळी माजी मंत्री तथा विद्यमान आमदार रविशेठ पाटील, माजी खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह नगराध्यक्ष प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, पक्षप्रतोद अनिरुद्ध पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी जिवन पाटील, सहाय्यक मुख्याधिकारी राजाराम नरुटे, नगरपालिकेचे सभापती व अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी केदार जाधव यांच्या हस्ते इनडोअर स्टेडियमच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर केदार जाधव आणि मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते फीत कापून स्टेडियमचे लोकार्पण करण्यात आले. विशेष म्हणजे, स्टेडियमचे उद्घाटन केल्यानंतर केदार जाधव आणि आदिती तटकरे यांनाही क्रिकेट खेळण्याचा मोह आवरला नाही. दोघांनीही मैदानात उतरून क्रिकेट खेळण्याचा आनंद घेतला. या प्रसंगाने उपस्थितांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला.

यानंतर आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, पक्षप्रतोद अनिरुद्ध पाटील आणि नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांना

धनादेश, रोख पारितोषिके तसेच क्रिकेट साहित्याच्या किटचे वाटप

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी केले. यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या मनोगतातून पेण नगरपालिकेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. त्यानंतर प्रमुख अतिथी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू केदार जाधव यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. प्रशिक्षकांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, तर गुणवंत खेळाडूंची कमतरता भासणार नाही. खेळाडूंनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. मेहनत घेतल्यास यश निश्चित मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच १५ जानेवारी २०१७ रोजी पुण्यात इंग्लंडविरुद्ध खेळलेल्या सामन्यातील अनेक रंजक आठवणी ही त्यांनी यावेळी सांगितले. केदार जाधव यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी आणि त्यांच्या बॅटवर स्वाक्षरी घेण्यासाठी लहानग्या क्रिकेटपटूंनी मोठी गर्दी केली होती. आपल्या आवडत्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूला जवळून भेटण्याची संधी मिळाल्याने बालखेळाडूंचा आनंद ओसंडून वाहत होता. पेणम ध्ये उभारण्यात आलेले हे इनडोअर टर्फ स्टेडियम रायगड जिल्ह्यातील नवोदित क्रिकेटपटूंच्या कौशल्याला नवी दिशा देणारे आणि भविष्यातील क्रिकेटपटू घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

गोंडपिपरी नगरपंचायतीला विकासकामांसाठी २ कोटींचा निधी मंजूर

अक्षराज : संतोष बांदूरकर

दि.०७, गोंडपिपरी (चंद्रपूर) : गोंडपिपरी शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी नगरपंचायती अंतर्गत विविध १० विकास कामांसाठी तब्बल २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार देवरावदादा भोंगळे यांच्या प्रयत्नातून हा निधी उपलब्ध झाल्याने शहरातील विविध प्रभागांमधील प्रलंबित विकासकामांना गती मिळणार आहे.मंजूर निधीत प्रभाग क्रमांक ७ मधील मच्छी-मटन मार्केटच्या विकासासाठी ३० लाख रुपये, दर्ग्याकडे जाणाऱ्या मार्गावरील सर्वधर्मीय स्मशानभूमीच्या विकासासाठी १५ लाख रुपये, प्रभाग क्रमांक ८ मधील बौद्ध विहारासमोरील परिसरात शेड बांधकामासाठी १५ लाख रुपये, प्रभाग क्रमांक ९ मधील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या मैदान व बगीच्याच्या विकासासाठी १५ लाख रुपये, तर प्रभाग क्रमांक १० मधील माता मंदिर परिसरातील मैदान व बगीच्याच्या विकासासाठी १५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. तसेच नगरपंचायतीच्या वाचनालयाचे नूतनीकरण व फर्निचरसाठी २० लाख रुपये, प्रभाग क्रमांक १४ मधील श्रीराम मंदिर परिसरात समाज सभागृह बांधकामासाठी ३५ लाख रुपये, प्रभाग क्रमांक १५ मधील महादेव मंदिर परिसरात समाज सभागृह बांधकामासाठी १५ लाख रुपये, प्रभाग क्रमांक १ मधील प्लॉट क्रमांक २२७/१ येथील नगरपंचायतीच्या मैदानाच्या विकासासाठी १५ लाख रुपये, तर प्रभाग क्रमांक ७ मधील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेजवळील मैदान विकसित करण्यासाठी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या १० कामांमुळे शहरातील सार्वजनिक सुविधा, सामाजिक सभागृहे, क्रीडांगणे, वाचनालय तसेच मूलभूत सुविधांचा विकास होण्यास मदत होणार आहे.



आई बाबा फाउंडेशन तर्फे स्वच्छता कर्मचारी भगिनींचा साडी, मिठाई देऊन सन्मान



अक्षराज : अदित्य चिकटे

दि.०७, किनगाव (अहमदपूर) : गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही आई बाबा फाउंडेशनच्या वतीने दीपावली सणाचे औचित्य साधून ग्राम पंचायत किनगाव येथील स्वच्छता विभागात कार्यरत महिला कर्मचारी भगिनींसाठी साडी वाटप व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२६ रोजी ग्रामपंचायत किनगाव येथे हा उपक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी ग्रामपंचायतीच्या स्वच्छता कर्मचारी अनिता वाहुळे, भाग्यशीला वाहुळे, कावेरी वाहुळे, राजकन्या कांबळे, माधवी बोडके, जयश्री कांबळे, मीना वाहुळे, केवळबाई वाघमारे, लक्ष्मी कांबळे आदी महिला भगिनींना साडी, मिठाई व विविध भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला किनगावच्या सरपंच करुणाताई कांबळे, उपसरपंच विठ्ठलभाऊ बोडके, माजी ग्रामपंचायत सदस्य धम्मनंदभाऊ कांबळे, मेघराज चावरे, प्रीतम कांबळे तसेच ग्रामपंचायतीतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

आई बाबा फाउंडेशनच्या वतीने आदित्य चिकटे, कृष्णा यमते, राम कृष्ण मुरकुटे, किरण फड, विनायक दळवे, सिद्धेश्वर मुरकुटे, सचितानंद यमते, सुदर्शन बोडके तसेच ग्रामस्थ विश्वदीप वावळे, संतोष भाऊ, देविदास वावळे आदींनी उपस्थित राहून या उपक्रमात सहभाग घेतला. समाजाच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या स्वच्छता कर्मचारी भगिनींच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलावे, त्यांच्या कष्टांप्रती कृतज्ञता व्यक्त करता यावी आणि दिवाळीचा आनंद त्यांच्या जीवनातही द्विगुणित व्हावा, या उदात्त हेतूने आई बाबा फाउंडेशनच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

स्वच्छता कर्मचारी हे समाजाच्या आरोग्याचे खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या कष्टांचा सन्मान करणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. या उपक्रमातून समाजात स्वच्छतेचे महत्त्व आणि श्रमाचा सन्मान करण्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

स्वच्छता कर्मचारी भगिनींच्या कष्टांना मानाचा मुजरा!

उद्योगमंत्री सामंत आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०७, नांदेड : राज्याचे उद्योग, गुंतवणूक, सेवा व मराठी भाषा विभागाचे मंत्री डॉ.उदय सामंत हे रविवार, दि.०८ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. रविवार, दि.८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.१५ वाजता ते नांदेड येथून मोटारीने सायाळ (ता. जि. नांदेड) येथे जाण्यासाठी प्रयाण करतील. सकाळी ११.४५ वाजता सायाळ येथे शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करणार आहेत. दुपारी १ वाजता सायाळ येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. दुपारी १.३० वाजता नांदेड येथे आगमन होईल. त्यानंतरचा वेळ राखीव राहील.



दुष्काळाचे सावट, तरीही दिवाळीच्या खरेदीसाठी टाकळी ढोकेश्वरच्या बाजारपेठेत गर्दी



अक्षराज : वसंत रांधवण

दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) : दुष्काळी परिस्थितीचे सावट असताना ही अंधारातून प्रकाशाकडे नेणारा आनंदाचा दीपोत्सव येऊन ठेपला आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर शहरातील बाजारपेठ सजली असून, ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या रंगीबेरंगी स्टॉल्सवर खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

आर्थिक अडचणी आणि दुष्काळी परिस्थितीमुळे यंदाच्या दिवाळीच्या उत्साहावर काहीसे मर्यादेचे सावट असले, तरी लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान निधी आणि दुष्काळी मदत निधीच्या माध्यमातून काही प्रमाणात पैसा हातात आल्याने नागरिक सणाची तयारी करताना दिसत आहेत. शहरातील बाजारपेठेत आकाशकंदील, पारंपरिक मातीच्या पणत्या, आकर्षक चायनीज पणत्या, तोरणे, रांगोळ्या, झाडू, दिवाळी किल्ले तसेच सैनिकांच्या मूर्ती अशा विविध वस्तूंची दुकाने थाटण्यात आली आहेत.

रंगीबेरंगी आणि विविध आकारातील आकाशकंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. १० रुपयांपासून ते ५००-६०० रुपयांपर्यंत आकाशकंदील उपलब्ध असून, आपल्या आवडीनुसार आणि आर्थिक क्षमतेनुसार नागरिक खरेदी करत आहेत. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये दिवाळीचा उत्साह पाहायला मिळत आहे.

दिवाळी म्हटले की, नवीन कपडे आणि फराळाची मेजवानी आलीच. त्यामुळे कपड्यांच्या दुकानांमध्ये ही ग्राहकांची वर्दळ वाढली आहे. रेडिमेड कपडे, साड्या तसेच लहान मुलांच्या आकर्षक पोशाखांना मागणी आहे. त्याचबरोबर घराघरांत दिवाळीचा फराळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीला ही वेग आला आहे. किराणा दुकानांमध्ये तेल, रवा, साखर, खोबरे, सुका मेवा आदी वस्तूंच्या खरेदीसाठी ग्राहकांची लगबग सुरू आहे. लाडू, चिवडा, करंजी यासारख्या पारंपरिक फराळाच्या पदार्थांची तयारी महिलांकडून केली जात आहे. फटाक्यांच्या दुकानांवरही ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसमोर आर्थिक प्रश्न उभे आहेत. त्यामुळे खरेदी करताना नागरिकांकडून खर्चाचा विचार केला जात आहे. तरीही उपलब्ध आर्थिक साधनांतून सणाचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न प्रत्येक कुटुंबाकडून होत आहे. शासकीय योजनांच्या माध्यमातून मिळालेल्या तुटपुंज्या का होईना आर्थिक मदतीमुळे बाजारपेठेत काही प्रमाणात चैतन्य निर्माण झाले आहे.

गुरुवार, दि.०५ नोव्हेंबरपासून वसुबारसेने दिवाळीच्या सणाला प्रारंभ झाला असल्याने धनत्रयोदशीला टाकळी ढोकेश्वर शहरात सणाची लगबग वाढली आहे. दिवाळी मोठी नाही, आनंदाला तोटा नाही. या उक्तीप्रमाणे आर्थिक परिस्थितीवर मात करत सर्व समाजघटक दीपोत्सवाच्या स्वागतासाठी सज्ज होत आहेत. शहरातील गृहिणी, दुकाने आणि बाजारपेठेतील रंगीबेरंगी सजावटीमुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, दुकानांकडे झळा सोसणाऱ्या टाकळी ढोकेश्वरकरांच्या चेहऱ्यावर ही दिवाळीच्या आनंदाची झलक दिसू लागली आहे.

ढोकेश्वर विद्यालयाचा पर्यावरणपूरक दिवाळीचा संकल्प; पर्यावरण रक्षण आणि पाणी बचतीचा विद्यार्थ्यांना संदेश

अक्षराज : वसंत रांधवण

दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) : राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेऊन फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी विद्यार्थ्यांना फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ दिली. दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण आहे. मात्र फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच पाण्याचा व इतर नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपव्यय टाळणे ही काळाची गरज आहे. रक्षण करणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. पर्यवेक्षक बाळासाहेब निवदुंगे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की स्वतः फटाके न फोडता कुटुंबीयांना व परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रोत्साहित करावे. यावेळी प्रा.अशोक गांगड, प्रा.राजेंद्र ढोणे, आतिष झावरे, योगेश मांढरे, देविदास आढरे, पोपट जगदाळे, नितीन ढोकले, भाऊसाहेब ढिंगडे, सचिन महानवर, बावासाहेब जाधव, सुनील झावरे, रविंद्र मते, निलम खिलारी, सुमन वाळुंज, नारायण शेळके, निलेश पाचर्णे, संदीप महाडुंके, अतुल सैद, सोनल रोहकले, वैशाली गायखे, श्रीरंग धामणे, सुरेखा ठाणगे, प्रिया डवळणे, कल्पना जाधव, मंगेश पोपळवट, अनिकेत बांगर, रामदास नरवडे, सिमा खोसे, सुवर्णा दिघे, संजना विसावसराव, कृष्णा खरे, विष्णू भदे, श्वेता शिर्के, दिनेश वायदंडे, स्वप्नील कदम, वसंत वाघेरे, ईसाबी शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल सैद तर आभार दिनेश वायदंडे यांनी मानले.



दैनिक
अक्षराज
• ठाणे, रविवार, दि.०८ नोव्हेंबर २०२६
संमिश्र









दिवाळीच्या प्रकाशासोबत माथेरानच्या हिरवाईचा संकल्प करूया

अक्षराज : चंद्रकांत सुतार

दि.०७, माथेरान : दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि उत्साहाचा सण! घराघरांत दिव्यांची रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी, फराळ आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळते. मात्र याच आनंदोत्सवात आपण निसर्गाप्रती असलेली आपली जबाबदारी विसरता कामा नये. विशेषतः निसर्गाचे वरदान लाभलेल्या माथेरानसारख्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील पर्यटनस्थळासाठी वृक्षसंवर्धन ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

माथेरानची खरी ओळख म्हणजे येथील हिरवीगार जंगले, उंचच उंच वृक्ष, विविध प्रकारच्या वनस्पती, पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांची मुक्त भटकंती आणि वन्यजीवांचा नैसर्गिक अधिवास. याच निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक माथेरानला भेट देतात. त्यामुळे माथेरानची ओळख केवळ पर्यटनस्थळ म्हणून नव्हे, तर निसर्गाचे जतन करणारे एक आदर्श पर्यावरणपूरक पर्यटनस्थळ म्हणून



निर्माण झाली पाहिजे.

आज वाढते प्रदूषण, बदलते हवामान, वृक्षांची घटती संख्या आणि निसर्गातील मानवी हस्तक्षेप या गोष्टी पर्यावरणासाठी चिंतेचा विषय बनल्या आहेत. अशा परिस्थितीत दिवाळीच्या निमित्ताने प्रत्येक कुटुंबाने एक तरी देशी वृक्ष लावण्याचा संकल्प केला तर पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

माथेरानमध्ये वृक्षलागवड करताना येथील नैसर्गिक जंगलाचा विचार करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. स्थानिक हवामान आणि मातीला अनुकूल असलेल्या देशी वृक्षांच्या प्रजातींची निवड करून वनविभाग व संबंधित प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली वृक्षलागवड करावी. केवळ झाड लावून आपली जबाबदारी संपत नाही, तर त्याला नियमित पाणी देणे, संरक्षण करणे आणि ते मोठे होईपर्यंत त्याची काळजी घेणेही आवश्यक आहे.

यासाठी माथेरानमधील नागरिक, सामाजिक संस्था, व्यापारी वर्ग, हॉटेल व्यावसायिक, शाळा, युवक मंडळे आणि पर्यटक यांनी एकत्र येण्याची गरज आहे. प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी, सणासुदीला किंवा एखाद्या आनंदाच्या प्रसंगी एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची सवय लावली तर भविष्यात माथेरानच्या हिरवाईत निश्चितच भर पडेल.

दिवाळी साजरी करताना फटाक्यांचा मर्यादित वापर, प्लास्टिकचा कमी वापर, कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही याची काळजी घेणेही तितकेच गरजेचे आहे. कारण दिवाळीचा खरा प्रकाश केवळ घरातील दिव्यांमधून नव्हे, तर निसर्गाच्या हिरवाईतूनही दिसला पाहिजे.

आज आपण एक झाड लावले तर उद्या त्याच झाडाच्या सावलीत एखादा पर्यटक विसावा घेईल, पक्षी आपले घरटे बांधतील आणि पुढील पिढीला स्वच्छ हवा मिळेल. निसर्गाने माथेरानला भरभरून दिले आहे. आता त्या निसर्गाचे ऋण फेडण्याची वेळ आपली आहे.

चला तर मग, यंदाच्या दिवाळीत एक दिवा घरासाठी लावूया आणि एक वृक्ष माथेरानच्या भविष्यासाठी लावूया! कारण माथेरानची खरी श्रीमंती येथील इमारतींमध्ये नाही, तर येथील हिरव्यागार जंगलात आहे.

एक दिवस दिवाळीचा, तर एक दिवस वृक्षलागवडीचा... हा संकल्प प्रत्येक माथेरानकराने मनापासून स्वीकारूया!

नमुंमपा अग्निशमन दलाची 'आनंदी दिवाळी, सुरक्षित दिवाळी' विशेष मोहीम

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०७, नवी मुंबई : दिवाळी हा आनंदाचा व उत्साहाचा सण असून या सणानिमित्त नागरिकांकडून घरे व इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते. तसेच मोठ्या प्रमाणावर फटाके फोडण्यात येतात. मात्र फटाक्यांचा निष्काळजी वापर आणि विद्युत रोषणाईतील तांत्रिक दोषांमुळे आगीच्या दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा दुर्घटना टाळण्यासाठी आणि नागरिकांची दिवाळी सुरक्षित व निर्विघ्नपणे पार पडावी यासाठी अग्निशमन विभागातर्फे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अग्निशमन विभागप्रमुख तथा शहर अभियंताशिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली 'आनंदी दिवाळी, सुरक्षित दिवाळी' या संकल्पनेंतर्गत नागरिकांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

या जनजागृती मोहिमेअंतर्गत उप मुख्य अग्निशमन अधिकारीपुरूषोत्तम जाधव यांच्यासह अग्निशमन केंद्र अधिकारी व अग्निशमन जवान सोसायट्यांमध्ये जाऊन माहितीपत्रेक वितरीत करीत असून नागरिकांनी घ्यावयाच्या काळजीविषयी अवगत करीत आहेत. त्याचप्रमाणे विविध समाजमाध्यमांवरूनही जनजागृती करण्यात येत आहे.

या कालावधीत नागरिकांनी काय करावे व काय करू नये याच्या मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

नागरिकांनी काय करावे ? हे करावे...



– सुरक्षित कपडे परिधान करावेत : फटाके फोडताना नागरिकांनी सुती कपडे परिधान करावेत.

– मोठ्यांची देखरेख असावी : लहान मुलांना नेहमी मोठ्या व्यक्तींच्या देखरेखीखालीच फटाके फोडू द्यावेत.

– संरक्षणात्मक उपाययोजना : सुरक्षिततेचा उपाय म्हणून बंद बूट आणि डोळ्यांच्या संरक्षणासाठी सुरक्षित चष्मा वापरावा.

– लांब अगरबत्ती किंवा मेणबत्तीचा वापर : फटाके पेटवताना अंतरावरून पेटवता यावे म्हणून लांब अगरबत्तीचा किंवा मेणबत्तीचा वापर करावा.

– मोकळी जागा निवडावी : फटाके फोडण्यासाठी घर, झाडे, विजेच्या तारा आणि ज्वलनशील वस्तूंपासून लांब असलेली मोकळी जागा निवडावी तसेच एका वेळी एकच फटाका पेटवावा.

– पाणी व वाळू सज्ज ठेवावी : आगीची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास ती तात्काळ विझवण्यासाठी जवळ पाण्याने भरलेली बादली किंवा वाळूची बादली ठेवावी.

नागरिकांनी काय टाळावे ? हे करू नये...

– धोकादायक व बंदिस्त जागेत फटाके फोडू नयेत : घरामध्ये, इमारतीच्या जिन्यात, विद्युत तारा, गॅस पाईपलाईन व वाहनतळाजवळ (पार्किंग) फटाके फोडू नयेत.

– हवेत उडणारे रॉकेट : हवेत उडणारे रॉकेट लोकांच्या, प्राण्यांच्या किंवा थेट घरांच्या दिशेने जाऊ शकतात, त्याची विशेष काळजी घ्यावी.

– फसलेला फटाका पुन्हा पेटवू नये : न फुटलेला किंवा फसलेला फटाका पुन्हा पेटवण्याचा धोकादायक प्रयत्न करू नये.

– विद्युत ओव्हरलोडिंग टाळावे : घरांवर विद्युत रोषणाई करताना ओव्हरलोडिंग व अनधिकृत जोडण्या करणे टाळावे.

– स्वत: विद्युत जोडणी करू नये : विद्युत रोषणाईची सर्व कामे प्रशिक्षित इलेक्ट्रिशियनकडूनच सुरक्षितपणे जोडून घ्यावीत.

फटाक्यांमध्ये फेरफार करू नये : फटाक्यांच्या बारूदात कोणतीही छेडछाड किंवा फेरफार करू नये, तसेच फटाके कधीही खिशात ठेवू नयेत.

नमुंमपा अग्निशमन दलाच्या वतीने या सूचना तसेच दिवा उजळू दे प्रकाशाचा, नको अंधार निष्काळजीपणाचा हा संदेश विविध माध्यमांतून नागरिकांपर्यंत पोहचविला जात आहे.

रोहित पठारे हत्याकांडात आणखी ७ जण जेरबंद !

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०७, छत्रपती संभाजीनगर : बीडमधील संतोष देशमुख हत्याकांडाची आठवण करून देणाऱ्या आणि संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या वैजापूर येथील बहुचर्चित रोहित पठारे हत्या प्रकरणात पोलिसांनी कारवाई केली आहे. जुन्या वादातून तरुणाला घरातून जबरदस्तीने पळवून नेत चौकाचौकात फिरवून बेदम मारहाण करणे, अंगात स्क्रू-ड्रायव्हर खुपसणे आणि तहान लागली असता पाणी मागितल्यावर तोंडावर लघवी करण्यासारख्या अत्यंत अमानुष व संतापजनक कृत्याने हा परिसर हादरला होता. याच हाय-प्रोफाइल आणि थरारक प्रकरणात वैजापूर पोलिसांनी मोठी कारवाई करत आणखी ७ जणांना जेरबंद केले असून, आतापर्यंत मुख्य आरोपीसह तब्बल १० नराधमांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. न्यायालयाने सर्व आरोपींना ६ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

रोहित अनिल पठारे (वय २३)मयताचे नाव आहे तर अमन सत्यपाल उंटवाळ, आनंद संतोष मथुरे उर्फ राजपूत, अमर मदनसिंग राजपूत, शंकर उर्फ प्रतीक राजू राजपूत, गजू उर्फ गजेंद्र रविंद्रसिंग राजपूत, क्रिश प्रतमसिंग राजपूत, लोकेश उर्फ सोनू गबरसिंग राजपूत, प्रमोद ज्ञानेश्वर वाघचौरे, मयूर बाबासाहेब राहणे आणि विशाल कडे असे एकूण १० आरोपी अटक आरोपींची नावे आहे.

नेमकी घटना काय आहे?

गणपती विसर्जन मिरवणुकीतील जुन्या वादातून वैजापूर शहरातील येवला रोडवरील एका हॉटेलसमोर दोन गटात सशस्त्र हाणामारी झाली होती. या वादातून संशयितांनी रोहित पठारे याला त्याच्या घरातून पळवून नेत चौकाचौकात फिरवून अत्यंत निर्दयपणे मारहाण केली. नराधमांनी दगडाने त्याचे पाय ठेचले आणि शरीरात स्क्रू-ड्रायव्हर खुपसला. रक्तबंबाळ आणि गंभीर जखमी अवस्थेत असताना रोहित



तहानने व्याकुळ होऊन पाणी मागत होता, मात्र नराधमांनी पाणी देण्याऐवजी त्याच्या तोंडावर लघवी केल्याचा अत्यंत संतापजनक आरोप नातेवाईकांनी केला आहे. उपचारादरम्यान रोहितची प्राणज्योत मालवली. या प्रकरणी हत्या, अपहरण आणि ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शेवगावच्या निर्जनस्थळी लपला होता मुख्य आरोपी !

या प्रकरणातील मुख्य आरोपी अमन सत्यपाल उंटवाळ हा शेवगाव तालुक्यातील टाकळी परिसरातील एका निर्जनस्थळी असलेल्या बंद घरात लपून बसल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अत्यंत शिताफीने सापळा रचून त्याला जेरबंद केले. या गुन्ह्यातील उर्वरित फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके वेगवेगळ्या भागात वेगाने चक्रे फिरवत आहेत. या अमानुष हत्या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून तीव्र पडसाद उमटत आहेत. शनिवारी रिपाइं (आठवले गट) नेते संजय ठोकळ, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष भालेराव आणि वंचित बहुजन आघाडीचे अफसर खान यांच्यासह विविध नेत्यांनी पठारे कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले आणि पोलिसांकडे कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली.

प्रभाग २९ मध्ये नव्या २ मजली सुलभ शौचालयाचे भूमिपूजन !

दीड महिन्यात काम पूर्ण होणार – नगरसेवक बाबाजी पाटील



अक्षराज : विनोद वास्कर

दि.०७, शिळफाटा (ठाणे) : प्रभाग क्रमांक २९ मधील भारत गियर, भोलानाथ नगर, खरवली माता परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी नव्याने दोन मजली (ग्राउंड प्लस वन) सुलभ शौचालय उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन नगरसेवक बाबाजी पाटील व नगरसेविका अर्चना पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सदर ठिकाणी गेल्या २० ते २२ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले शौचालय जुने झाले होते. त्याची केवळ दुरुस्ती करण्याऐवजी ते पूर्णपणे पाडून त्या ठिकाणी नव्याने सुसज्ज शौचालय उभारावे, अशी मागणी स्थानिक विभागप्रमुख, शाखाप्रमुख आणि नागरिकांनी केली होती. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेमार्फत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून नव्या शौचालयाच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे.

कामाच्या कालावधीत नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रथम चार सीटचे रेडीमेड शौचालय बसविण्यात येणार असून त्यानंतर जुन्या शौचालयाचे पाडकाम करण्यात येईल. पाडकामानंतर अवघ्या दीड महिन्याच्या कालावधीत नवीन शौचालयाचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी विभाग प्रमुख गणेश मुंडे, शाखाप्रमुख मोरे, ज्येष्ठ नागरिक खंडागळे, तुकारामजी म्हात्रे, सावण ठाकूर, राजेश म्हात्रे, तसेच परिसरातील अनेक ग्रामस्थ, माता-भगिनी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







'रिहॅबिक्स फिजिओथेरपी क्लिनीक' चा दिमाखदार शुभारंभ...



दि.०७, वाई (सातारा) : वाईकरांच्या आरोग्याच्या नव्या सेवेसाठी आणि उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ब्राह्मणशाही परिसरातील दुण्डिविनायक चौक येथे सुरू झालेल्या 'रिहॅबिक्स फिजिओथेरपी क्लिनीक'चा भव्य शुभारंभ सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात पार पडला. या नवीन क्लिनिकचे उदघाटन डॉ.शंतनू क्षीरसागर यांचे आई-वडील, सुनंदा क्षीरसागर आणि सातारा जिल्ह्यातील ज्येष्ठ छायाचित्रकार सुधीर विठ्ठल क्षीरसागर यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आले.

मान्यवरांची विशेष उपस्थिती : या उद्घाटनाच्या विशेष सोहळ्यास सातारा जिल्ह्याचे पोलीस प्रमुख निखिल पिंगळे, वाईचे नगराध्यक्ष अनिल सावंत, पंढरपूर येथील गुरव समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप गुरव, गजानन गुरव, तसेच साताऱ्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पुजारी, पुण्यातील कायदे तज्ञ ॲड.कीर्तिराज शैलेंद्र आगलावे, यांच्यासह सातारा जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि ग्रामस्थ, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.